सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

काळाचौकी पोलीस ठाणे
Kalachowky Police Station
Veer Srikant Hadkar Marg, Kalachowky, Mum-33.
Phone No.: 022-223754128/23757357/23733043
E-mail :ps.kalachowki.mum@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेस नोट दिनांक: ०२/०१/२०२५

०१ बांगलादेशी नागरिकास अटक केलेबाबत.

दिनांक ०१/०१/२०२५ रोजी इसम नामे नोयोन तोकिबोर शेख, वय 24 वर्षे, धंदा इलेक्ट्रीशियन, सध्या रा.ठी. सीटी कॉर्नर, प्लॉट न 12-ए/13, सेक्टर 05, प्लॅट नं. 503, तळोजा, फेस नं. 1, नवी मुंबई. मुळ गावचा पत्ता - पिडोली, जिल्हा नोडाई, ठाणा कालेया, राज्य खुलना, देश बांग्लादेश.

दिनांक 31/12/2024 रोजी नवीन वर्षाच्या आगमनाकरिता मा. वरिष्ठांच्या आदेशाने पोलीस ठाणे हद्दीत पोउपनि व्यवहारे, ए टी सी पथक पो.शि.क्र. ०९३२३९/इंतेजकुमार वळवी, पो.शि.क्र. ११०८०७/ स्वप्निल पाटील, पो. शि.क्र. १११३१५/गणेश कोळेकर, सपोनि हस्सन मुलाणी, पोउपनि राजेंद्र चव्हाण, सफौ चंद्रशेखर परब यांच्यासह गस्त करित असतांना एक इसम हा सार्वजनिक शौचालय, रे रोड, मुंबई येथे संशयास्पद रित्या फिरतांना आढळून आला. पोलीस पथकास पाहून सदरचा इसम हा पळून जावू लागला. त्याचवेळी सदर इसमास पाठलाग करुन पकडण्यात आले.

त्यानंतर आम्ही पोलीस पथकाने नमूद इसमास जागीच अटकाव केला व त्यास आमची स्वतःची पोलीस असल्याची ओळख सांगून त्याची प्राथमिक चौकशी केली असता, त्याने प्रथम उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यावरुन त्याच्यावर संशय बळावल्याने त्यास अटकाव करुन त्यास ताब्यात घेवुन आम्ही काळाचौकी पोलीस ठाणे येथील दहशतवाद विरोधी पथक कक्षात आणून त्याची चौकशी केली असता सदर इसमाचे नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव व पत्ता नोयोन तोकिबोर शेख, मुस्लिम वय 24 वर्षे, मुळगाव पिडोली, जिल्हा नोडाई, ठाणा कालेया, विभाग खुलना, देश बांग्लादेश असे असल्याचे सांगितले. तसेच त्याच्याकडे भारतात येण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वैध प्रवासी कागदपत्रांची मागणी केली असता त्याने कोणतीही वैध प्रवासी कागदपत्रे त्याचेकडे नसुन तो गैर कायदेशीर मार्गाने भारतात प्रवेश करुन भारतात वास्तव्य करित असल्याचे सांगितले.

सदर इसमाचा सविस्तर जबाब नोंदवून काळाचौकी पोलीस ठाणे, गु.र.क्रं. ००१/२०२५ नियम ३(A) सह ६ (A) पारपत्र (भारतात प्रवेश) १९५० सह परिच्छेद ३(१) परकीय नागरीक आदेश १९४८ सह १४ परकीय नागरिक कायदा १९४६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

आरोपीला मा. न्यायालयासमोर हजर केले असून त्यांनी दिनांक ०४/०१/२०२५ पर्यत पोलीस कस्टडी रिमांड मिळालेला आहे. यातील अटक आरोपीस ताब्यात घेण्यात आले असून नमुद गुन्हयाचा तपास सुरू आहे.

तपासा दरम्यान आरोपीकडे भारतीय असल्याबाबत आधार कार्ड, पॅन कार्ड व मतदान कार्ड बनवून हे बनावट दस्तऐवज ठकवणूक करण्यासाठी वापरला जावा या उद्देशाने बनावटीकरण केले. सदरचे दस्तऐवज, प्राधिकार पत्र हे बनावटीकरण करुन त्याचा भारतात अवैध रित्या राहणेसाठी लाभांश घेणे व सदरचे दस्तऐवज हे खोटे व बनावट असल्याचे माहित असुन सुध्दा ते खरा म्हणून अप्रामाणिकपणे, कपटीपणाने व लबाडीच्या इराद्याने वापरले म्हणून सदर गुन्हयात कलम 336(3), 337, 338, 340 बी एन एस 2023 ची वाढ करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी ही मा. पोलीस आयुक्त, श्री विवेक फणसळकर मा. विशेष पोलीस आयुक्त, श्री देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त का व सु श्री सत्यनारायण, मा. अपर पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक विभाग, श्री अनिल पारसकर, मा. पोलीस उप आयुक्त, परीमंडळ ०४, श्रीमती रागसुधा आर, मा. सहा. पोलीस आयुक्त भोईवाडा विभाग, श्री घनश्याम पलंगे, श्री. जगदीश शेलकर, प्र.वरीष्ठ पोलीस ठाणे काळाचौकी पोलीस ठाणे यांच्या मार्गदशानाखाली तपासी अधिकारी पोउपनि धनंजय व्यवहारे दहशतवादी विरोधी कक्ष पो.शि.क्र. ०९३२३९/इंतेजकुमार वळवी, पो.शि.क्र. ११०८०७/ स्वप्निल पाटील, पो. शि.क्र. १११३१५/गणेश कोळेकर यांनी यशस्वीपणे पुर्ण केली आहे.